**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रतापराव गोविंदराव पवार,
सक्रेटरी, दि पूना स्कूल अँड होम फार ब्लाईंड
अंध मुलींची शाळा,
१४/१७, कोरेगाव पार्क, पुणे-४११ ००१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
तहसीलदार हवेली, ता. हवेली, जि. पुणे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार हवेली, ता. हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. प्रतापराव गोविंदराव पवार,
सक्रेटरी, दि पूना स्कूल अँड होम फार ब्लाईंड, अंध मुलींची शाळा,
१४/१७, कोरेगाव पार्क, पुणे-४११ ००१

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली, ता. हवेली, जि. पुणे
श्री. संजीव ना. देशमुख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सूची क्र.२ व अ पत्रके तहसीलदार हवेली यांनी तलाठी कोथरुड यांचेकडे वेळोवेळी पाठवून व ते मिळाल्यानंतर तलाठी यांनी त्याबाबत कोणती कार्यवाही केली याबाबत माहिती

१) दस्त क्र. ८९९/७१ दि. १२.४.१९७१

२) दस्त क्र. १८३८/८०/८० दि. ५.५.१९८०

३) दस्त क्र. ४४९० /८० दि. ६.६.१९८०

## विवेचन

अपीलकर्ता श्री. प्रतापराव गोविंदराव पवार यांनी ७/१२ सदरील जागेची हक्क नोंदणी बाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, जि. पुणे यांच्याकडे मागितली होती. ती न मिळाल्यामुळे श्री. पवार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे श्री. पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. पवार हे अंध मुलींची शाळा, कोथरूड, पुणे (दि पूना स्कूल अँड होम फॉर द ब्लाईंड ट्रस्ट) या संस्थेचे सचीव आहेत. 'मौजे कोथरूड, ता. हवेली, जि. पुणे येथील स.नं. ७५/१, १ब, २/अ चे नोंदीसाठी विविध खात्यांमध्ये पाठपुरावा करणेसाठी श्री. म.ना.पाटील, बुधवार पेठ, पुणे यांची संस्था मे. भास्कर पाटील, पुणे यांना पैसे दिले होते. सदरचे काम होणेच्या अनुषंगाने श्री. म.ना. पाटील, बुधवार पेठ, पुणे यांनी तहसीलदार, हवेली व जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत अर्ज केले होते. त्या अनुषंगाने तहसीलदार, हवेली यांचेकडून दि. ३०.५.२००६ रोजी संस्थेच्या प्रतिनिधी श्रीमती रजनी इंदलकर यांना श्री. संदेश शिर्के, निवासी नायब तहसीलदार, हवेली यांनी समक्ष चर्चा करून आवश्यक ती सर्व माहिती दिली होती. तत्पूर्वी तथापी श्री. पाटील यांनी संस्थेकडून वारंवार पैशाची मागणी केल्याने, तसेच त्यांचेकडून कामाबाबत योग्य तो प्रतिसाद मिळत नसलेने त्यांचेकडून सदरचे काम परत घेण्यात आलेले होते. सदरचे काम परत घेण्यापूर्वी त्यांना विविध फॉर्मवर माझेमार्फत सह्या देण्यात आलेल्या होत्या. मला आवश्यक असलेली सर्व माहिती निवासी नायब तहसीलदार, हवेली व तहसीलदार, हवेली यांचेमार्फत

मिळालेली असलेने सदर अपील मागे घेत आहे,' असे श्री. पवार यांचे निवेदन त्यांच्या प्रतिनिधी सौ. उज्वला साळवे यांनी आयोगाला सादर केले.

'संबंधित अपील श्री. पवार यांनी स्वत: दाखल केलेले नसून श्री. म.ना. पाटील, पाटील सदन, ५८७, बुधवार पेठ, पुणे यांनी श्री. पवार यांच्या वतीने दाखल केलेले आहे. श्री. म.ना. पाटील हे विविध संस्था व व्यक्तींकडून कामे करून देण्याच्या नावाखाली माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा गैरवापर करून अर्ज व अपिले करीत आहेत,' असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली श्री. संजीव ना. देशमुख यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले असून अशा ७३ व्यक्तींचा नावानिशी तपशील आयोगाला सादर केला.

सुशिक्षित नागरिक अशा प्रकारे एखाद्या व्यक्तीला पैसे देऊन व कोऱ्या अर्जावर सह्या देऊन अधिकार देतात, माहितीच्या अधिकारांतर्गत त्याचा वापर केला जातो, असे उभय बाजूंच्या निवेदनावरून आढळते. हा प्रकार चिंताजनक, कायद्याच्या गैरवापराला हातभार लावणारा व आक्षेपार्ह असून आयोग त्याची गंभीर दखल घेत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपीलकर्त्याची तक्रार राहिलेली नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली श्री. संजीव ना. देशमुख यांनी सादर केलेल्या निवेदनातील ७३ अर्जदार /अपीलकर्ते यांचे माहिती-मागणीचे अर्ज वा अपिले यांच्या संदर्भातील म्हणणे मागवून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाला सादर करावा, असा आदेश आयोगाने दि. ४.१२.२००७ रोजी दिला आहे. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली श्री. संजीव ना. देशमुख यांनी दि. ३०.३.२००८ पर्यंत त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ७.३.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संपतराव लक्ष्मण सावंत
फिनिक्स, ५३/५अ, शिवाजीनगर, संगमनगर, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
सातारा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६३ / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संपतराव लक्ष्मण सावंत
फिनिक्स, ५३/५अ, शिवाजीनगर, संगमनगर, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सातारा, जि.सातारा
प्रतिनिधी श्री.प्रशांत पिसाळ
**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
सातारा, जि. सातारा श्री.प्रशांत पिसाळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.६.२००८ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | मौजे खेड, ता.सातारा येथील स.नं.५३/४/३ व स.नं.५३अ/५अ/१क या श्री.कर्णे यांनी खरेदी केलेल्या जमिनीची नोंद सदर व्यक्तीचे नावावर जमीन आहे का, हे पाहून केली आहे का. नसेल तर नियमाप्रमाणे ही नोंद कमी करावी. सदर जमिनी ह्या नवीन शर्तीच्या असल्यामुळे सदर व्यक्तीच्या नावावर पूर्वी जमिनी नसतील तर सर्व नोंदी रद्द कराव्यात. |

## विवेचन

मौजे खेड, ता.सातारा येथील काही जमिनीच्या खरेदीबाबत संबंधित खरेदीदार शेतकरी असल्याचे सन १९९१ पासूनचे दाखले अपीलकर्ता श्री.संपतराव ल.सावंत यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांच्याकडे मागितले होते व ते नसलयास नोंदी रद्द करण्याची मागणी केली होती. ही माहिती न मिळाल्यामुळे श्री.सावंत यांनी केलेल्या अपिलाची दखल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, सातारा यांनी विहित मुदतीत घेतलेली नाही, राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतर उत्तर दिले, म्हणून श्री.सावंत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

राज्य माहिती आयोगाने दि. २३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

संबंधित खातेदार श्री.कर्णे यांनी सन २००७ मध्ये जमीन खरेदी करताना शेतकरी असल्याचा दाखला अथवा ७/१२ उतारा सादर केला नसल्यामुळे तो श्री.सावंत यांना देता आला नाही, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सातारा श्री.प्रशांत पिसाळ यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री.सावंत यांनी प्रथम अपील केलेले नाही, मात्र दिलेले उत्तर योग्य आहे, असे श्री.पिसाळ यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले.

श्री.सावंत हा विषय विविध अर्जांद्वारे मांडत असून मूळ अर्जात त्यांनी कोणत्याही नकला मागितलेल्या नाहीत. अर्जदार शेतकरी नसतील तर नोंदी कशा केल्या, असे प्रश्न करुन या नोंदी रद्द करण्याची मागणी त्यांनी केली आहे. अन्य दोन अर्जांबाबत त्यांनी मागितलेल्या नकला दिल्या, मात्र त्यांच्या मागणीनुसार पोटहिश्श्यातील नोंदीबाबतची दुरुस्ती करता येणार नाही, असे त्यांना स्पष्ट करण्यात आले. खरेदी व्यवहार रद्द करण्याबाबतची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून स्वतंत्र नियमावलीनुसार त्यासाठी श्री.सावंत यांनी अर्ज करावे लागतील, हेही त्यानी लेखी व तोंडी सांगण्यात आले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी श्री.पिसाळ यांनी केले. आरटीएस अपील हा 'क' वर्गातील अभिलेख असल्यामुळे पाच वर्षांसाठीच त्याचे जतन केले जाते. त्यामुळे ते उपलब्ध नसल्यामुळे देता आले नाही, असेही त्यांनी सांगितले.

श्री.सावंत यांनी केलेली मागणी महसूल न्यायालयीन प्रक्रियेशी निगडित आहे, ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र जमीन खरेदीबाबतचे अभिलेख कायम स्वरुपी जतनाचे असल्यामुळे संबंधित तलाठ्याकडील अभिलेखाची तपासणी करुन वस्तुस्थितीची नेमकी माहिती श्री.सावंत यांना दिली जाणे आवश्यक आहे.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सातारा यांनी तलाठ्याकडील अभिलेख तपासून उपरोक्त जमीन खरेदीबाबतची माहिती अपीलकर्त्यास दि.२०.३.२००९ पर्यंत द्यावी व पूर्ततेचा अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१३.३.२००८
५१-५३

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे, खंडपीठ ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे, खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. पिराजी नामदेव सरोदे
रा. ४२१, शुक्रवार पेठ, तळेगाव दाभाडे,
ता. मावळ, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
उप आयुक्त, सामान्य प्रशासन,
पुणे विभाग, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद, तळेगाव दाभाडे, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. पिराजी नामदेव सरोदे
रा. ४२१, शुक्रवार पेठ, तळेगाव दाभाडे,
ता. मावळ, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे-१

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, तळेगाव दाभाडे, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.२.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. सन १९९१ ते १९९४ चा लेखा परीक्षण अहवाल, प्यारा २२, दिवाळी सानुग्रह अनुदानासंबंधी आक्षेपीत परिशिष्टाची नक्कल

२. श्री. शेवडे, निवृत्त लेखापाल यांचे फायनल सेटलमेन्ट मधून कपात केलेल्या रकमांची खालील ए ते ई मधील माहिती

ए. उपदानातून किती रक्कम कापूर ठेवली

बी. आयकर कपात रक्कम किती

सी. वेतनातून कपात केलेली रक्कम

डी. व्यवसाय कर

ई. लास्ट पे सर्टिफिकेट

एफ. आयकर नमूना १६ मध्ये माहिती

३. श्री. शेवडे, श्री. बारवे, श्री. भेगडे व श्री. बांदल या चार निवृत्त कर्मचाऱ्यांच्या लेखा परीक्षण अहवाल, त्यांच्या अंतिम देयकामधून कपात केलेल्या रकमेचा तपशील, सेवानिवृत्तीनंतर मिळणारे अनुज्ञेय लाभ व हिशेब ताळेबंदाच्या नकला, निवृत्ती आदेशाची प्रत, या कर्मचाऱ्यांच्या नो ड्यूज सर्टिफिकेट दिले असल्यास त्याची प्रत

४. श्री. बारवे व श्री. भेगडे यांची अ.क्र.१ व २ प्रमाणे तसेच ए ते एफ पर्यंतची माहिती

५. श्री. सरोदे स्वतः निवृत्त होताना त्यांना शेवटचा जो पगार दिला त्याबद्दलचे अंतिम वेतन प्रमाणपत्र, ऑक्टोबर २००५ चे निवृत्तीधारकांना रकमा आदा करण्याबाबत सिंडिकेट बँकेत पाठवलेली यादी, निवृत्त लिपिक श्री. पारखे यांनी व्याज मिळावे म्हणून दिवाणी न्यायालयात दाखल केलेल्या दावा क्र. १३९/२००५ ची प्रत, चौथा व पाचवा वेतन आयोगानुसार दि. १.१.१९८६ व १.१.१९९६ रोजी निश्चित केलेले वेतनासंबंधी तक्ते व फरकाची रक्कम मिळालेली नाही, ती मिळणेत यावी

## विवेचन

तळेगाव दाभाडे नगरपरिषदेचा सन १९९१ ते १९९४ चा लेखा परीक्षण अहवाल, श्री. शेवडे, श्री. बारवे, श्री. भेगडे व श्री. बांदल चार निवृत्त कर्मचाऱ्यांच्या अंतिम देयकामधून कपात केलेल्या रकमेचा तपशील, तसेच अपीलकर्त्याच्या स्वतःच्या सेवाविषयक बाबींची माहिती अपीलकर्ता श्री. पिराजी नामदेव सरोदे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगर परिषद यांच्याकडे मागितली होती. श्री. सरोदे यांनी दोन अर्ज केले होते, त्यातील पहिला अर्ज महाराष्ट्र

माहिती अधिकार अधिनियमाखाली केला असल्याने व हा अधिनियम निरसित झाला असल्याने जन माहिती अधिकाऱ्यांनी निकाली काढला. दुसरा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खालील असल्यामुळे स्वीकारुन त्यांनी प्रती पान रु. १०/- नक्कलशुल्क भरण्यास श्री. सरोदे यांना कळविले. प्रतिपान पन्नास पैसे प्रमाणे शुल्क आकारले पाहिजे व त्यानुसार रक्कम कळविल्यानंतर आपण शुल्क भरु, असे जन माहिती अधिकाऱ्यांना कळवून श्री. सरोदे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील केले. परंतु उपआयुक्त (सामान्य प्रशासन ) यांना अपिलीय प्राधिकारी म्हणून नियुक्त करण्याचा शासनाचा आदेश प्राप्त झाल्यानंतर सुनावणीची प्रक्रिया सुरु केली गेली. 'श्री. सरोदे यांनी एकूण सहा अपिले दाखल केली होती, त्यापैकी पाच अपिलांमध्ये निकाल देण्यात आला आहे. हे सहावे अपील तहकूब ठेवण्याबाबत त्यांनी स्वतः विनंती केली होती म्हणून निकाल देण्यात आला नाही,' असे अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले. माहिती न मिळाल्यामुळे श्री. सरोदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. सरोदे यांनी वेळोवेळी मागणी केल्याप्रमाणे लेखा परीक्षक कार्यालयाकडून त्यांना माहिती देण्यात आली आहे. परंतु अनुज्ञेय आर्थिक लाभाबाबतची त्यांची मागणी प्रशासकीय बाबींशी संबंधित असल्याने नगर परिषद कार्यालयाशी संपर्क साधण्यास त्यांना कळविले आहे, असे उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा, पुणे श्री. अनिल वाघवसे यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. त्याच्या पुष्ट्यर्थ श्री. सरोदे यांना १८ वेळा दिलेल्या माहितीचा तपशील त्यांनी कागदपत्रांसह नमूद केला आहे.

श्री. सरोदे यांनी विस्तृत माहिती मागितली आहे, व माहितीसाठी आवश्यक शुल्क भरलेले नाही. तसेच बव्हंश माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आली आहे. त्यांनी केलेल्या अर्जांचे प्रमाणही मोठे आहे. आपल्या सेवाविषयक आर्थिक लाभाचा प्रश्न प्रलंबित असून अपुरी माहिती मिळाल्यामुळे आपण योग्य त्या न्यायमंचापुढे त्याबाबत आपली बाजू मांडू शकत नाही, असे श्री. सरोदे यांनी सांगितले. श्री. सरोदे यांनी दि. १६.१०.२००७ रोजी नगर परिषद कार्यालयात संबंधित अभिलेखाचे अवलोकन करून आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्रतिपृष्ठ रु.२/- प्रमाणे शुल्क भरून व नगर परिषदेने निर्धारित केलेल्या शुल्कानुसार प्रतिनक्कल रू. १०/- प्रमाणे शुल्क भरून माहिती प्राप्त

करून घ्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार श्री. सरोदे यांनी अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेल्या प्रती पुरविल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगर परिषद श्री. देविदास दगडूबा टेकाळे यांनी आयोगाला सादर केला आहे. तसेच आपल्याला आवश्यक त्या प्रती मिळाल्या असून आपली तक्रार दूर झाली आहे, असे निवेदन श्री. सरोदे यांनी आयोगाला सादर केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे, खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३.३.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ ) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८५ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. दादाभाऊ जयसिंग मासळकर<br>मु. पो. जातेगाव खु. ता. शिरूर, जि. पुणे |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, शिरूर जि. पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, शिरूर जि. पुणे |

अपील निर्गत कार्यक्रमास वरील तीनही घटक गैरहजर. तथापि माहिती देण्यास तयार असतानाही अर्जदाराने (स्वतः माहिती नेणार असल्याचे नमूद करूनही) संपर्क साधलेला नाही, असे अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २७.११.२००७ चे लेखी निवेदनानुसार असे नमूद केले आहे. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याने संपर्क साधल्यास माहिती निःशुल्क द्यावी.

**पुणे**
**दि. ३१.३.२००८**

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाळासाहेब रघुनाथ पोकळे,
स.क्र. १२०, जयभवानी नगर, पौड रोड,
कोथरुड, पुणे-४११ ०३८

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
तहसीलदार, मुळशी, ता. मुळशी, जि. पुणे

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
निवासी नायब तहसीलदार, मुळशी,
ता. मुळशी, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९२ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. बाळासाहेब रघुनाथ पोकळे, स.क्र. १२०, जयभवानी नगर, पौड रोड, कोथरुड, पुणे-४११ ०३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मुळशी, ता. मुळशी, जि. पुणे
श्री. अविनाश शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी, ता. मुळशी, जि. पुणे
श्री. हेमंत निकम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.७.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे केंदूर, ता. मुळशी, जि. पुणे येथील गट क्र. ९४, ९४८, ११७५, ७७९, ६१६, ६२२, ६७०, ६७६, ६७७, ६८९, ७१३ या गट नंबरची वारसनोंद होण्यासाठी दि. २८.१.२००५ रोजी अर्ज, प्रतिज्ञापत्र व इतर कागदपत्रे दिली होती, त्या अर्जावर आजपर्यंत काय कारवाई झाली याची सविस्तर माहिती. तसेच मौजे केंदूर, ता. मुळशी येथील वारस नोंदीचे किती अर्ज त्यानंतर आले होते. त्यावर कोणती कारवाई झाली आणि पेंडिंग आहेत व किती अर्जांच्या नोंदी झाल्या याची सविस्तर माहिती

## विवेचन

वारस नोंदीसाठी केलेल्या अर्जाच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.बाळासाहेब रघुनाथ पोकळे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी यांनी माहिती न दिल्यामुळे श्री.पोकळे यांनी अपीलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून श्री.पोकळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.पोकळे यांनी ७/१२ सदरी नावे दाखल करुन घेण्याची मागणी अर्जाद्वारे गाव कामगार तलाठ्यांकडे केली होती. श्री.संदेश शिर्के हे तत्कालीन निवासी नायब तहसीलदार होते. त्यांनी माहिती दिली नाही म्हणून श्री.पोकळे यांनी केलेल्या अपिलाबाबत तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्री.पांडुरंग मगदूम यांनी दखल घेतली नाही. आपण दि.२२.४.२००६ रोजी तहसीलदार, मुळशी या पदावर रुजू झाल्यानंतर श्री.पोकळे यांच्या अपिलावर सुनावणी घेऊन आदेश पारित केले, असे विद्यमान तहसीलदार श्री.अविनाश शिंदे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री.शिंदे यांनी पारित केलेल्या आदेशात श्री.शिर्के यांना २५०००/- रु. शास्ती लावली होती व

अर्जदाराला १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचा आदेश दिला होता. परंतु शास्ती करण्याचा अधिकार अपिलीय प्राधिकाऱ्यांना नाही, या संदर्भात श्री.शिर्के यांनी केलेले अपील मान्य करुन मुख्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांनी शास्तीचे आदेश रद्द केल्याचे श्री.शिंदे यांनी अनुषंगिक कागदपत्रांसह नमूद केले. श्री.शिर्के यांनी माहिती देण्याबाबत प्रयत्न केल्याचे निवेदन मुख्य राज्य माहिती आयुक्तांनी स्वीकारले आहे. तसेच अर्जदाराला आवश्यक ती माहिती दिली गेली आहे. मात्र प्रथम अपिलाची दखलच न घेण्याची श्री.मगदूम यांची कृती योग्य नाही. याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ, पुणे

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे
दि.१७.३.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.विलास शंकर शेलार
रा.स.नं.५८/१अे, एस.आर.पी.रोड,
वानवडी, पुणे - ४०

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष)
पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विलास शंकर शेलार रा.स.नं.५८/१अे, एस.आर.पी.रोड,
वानवडी, पुणे - ४०

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष)
पुणे महानगरपालिका डॉ.एम.एन.केरकट्टा

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका श्री.डी.ए.ठुबे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.३.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>वानवडी विभागात दि.१.१.१९९० ते ३१.१२.२००५ पर्यंत ज्या सोसायट्या व अपार्टमेंटस् अस्तित्वात आल्या आहेत त्यांची, तसेच त्यांच्या मालकांची / तेथे राहणाऱ्या निवासी / बिगरनिवासी सदनिकाधारकांची पुणे महानगरपालिकेच्या करआकारणी विभागाकडे अथवा हडपसर क्षेत्रिय कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती. |
|---|---|

## विवेचन

वानवडी भागातील सहकारी गृहनिर्माण संस्था व अपार्टमेंटस् याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.विलास शंकर शेलार यांनी मागितली होती. मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपातील असल्याने देणे अडचणीचे आहे, विशिष्ट भागातील नेमक्या मिळकतदारांची माहिती मागितल्यास देता येईल, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. त्याविरुध्द त्यांनी केलेले अपील याच कारणावरुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी फेटाळले. म्हणून श्री.शेलार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.शेलार यांनी दि.१.१.१९९० ते ३१.१२.२००५ या १५ वर्षांच्या काळातील माहिती मागितली आहे. अनेक बेकायदेशीर बांधकामे असल्यामुळे आपण सविसतर माहिती मागितली आहे, असे श्री.शेलार यांनी सांगितले. तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी बदलले असून माहितीची मागणी संदिग्ध स्वरुपात आहे. मालक / भाडेकरु यांच्या नावासह एवढी माहिती देणे यंत्रणेवर अवाजवी भार टाकणे असल्यामुळे श्री.शेलार यांनी नेमक्या मिळकतींची अपेक्षित माहिती नमूद केल्यास माहिती देता येईल, असे अपिलीय प्राधिकारी श्री.डी.ए.ठुबे यांनी सांगितले. जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित माहिती देणे 'अडचणीचे' म्हटले आहे, याचाच अर्थ काही माहिती लपविली जात आहे, असे प्रतिपादन श्री.शेलार यांनी केले. परंतु माहिती लपविण्याचा उद्देश नाही, सीडीच्या स्वरुपात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती देण्याची तयारी आहे, असे श्री.ठुबे, उपआयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले. संबंधित सीडी पाहून आपल्याला मिळालेली माहिती अपुरी वाटल्यास पुन्हा आयोगाकड धाव घेऊ, असे श्री.शेलार यांनी सांगितले.

१५ वर्षातील विस्तृत व सरसकट माहिती श्री.शेलार यांनी मागितली आहे. न्यायालयीन विषयासाठी आपल्याला माहिती आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. नेमकेपणाने माहितीची मागणी केल्यास त्यांना माहिती मिळणे अधिक सुलभ होईल. सीडीच्या स्वरुपात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती मिळाल्यानंतर अपुऱ्या वाटणाऱ्या तपशिलाची मागणी ते करु शकतात. तो या अर्जाचाच भाग समजण्यात येईल.

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) वानवडीतील नव्या गृहनिर्माण संस्था / अपार्टमेंटस् आदीसंबंधीची सीडीच्या स्वरुपातील माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क देण्यात यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल श्री.डी.ए.ठुबे, उपआयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी दि.२५.३.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि.१३.३.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. प्र.दा.मोकासदार — अपीलकर्ता
द्वारा श्री. एस.व्ही.देशपांडे
बी २, छत्रपती शि.हौ.सोसायटी,
पत्रकारनगरसमोर, गोखलेनगर, पुणे-४११ ०१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सह जिल्हा निबंधक (वर्ग-१)
दुगड चौक, मुथा हाईट्स, २रा मजला,
पुणे-३७ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
सह दुय्यम निबंधक, कार्यालय हवेली २,
पुष्प मंगल कार्यालय इमारत, २रा मजला,
बिबवेवाडी, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५० / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २८.१०.२००५ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | २८.२.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>आनंदनगर इमारत क्र.१, फ्लॅट क्र.२३, कोथरूड, पुणे-२९ येथे अपीलकर्ता व श्री. मुथा असोसिएट्स यांच्यामधील झालेला करार व इंडेक्सच्या प्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. प्र.दा.मोकासदार यांनी आनंदनगर येथील इमारत क्र.१, फ्लॅट क्र.२३, पौड रोड, कोथरूड या संबंधित मूळ दस्तऐवज क्र.१०२८६/८८ व इंडेक्स-२, सह जिल्हा दुय्यम निबंधक कार्यालय हवेली-२, पुणे-३७ यांचेकडून मिळणेबाबत माहिती-मागणी केली होती. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक कार्यालय, हवेली क्र.२, बिबवेवाडी, पुणे-३७ व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ पुणे-३७ यांच्याकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री. मोकासदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सदर अपिलाचा आयोगाने दि. १८.३.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमात' दि. २६.२.२००८ रोजीच्या पत्राने समावेश केला होता. संबंधित नस्ती बंद करावी, असे अपीलकर्ता श्री. मोकासदार यांनी दि. ५.३.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे. आयोग त्यांची विनंती मान्य करीत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २८.३.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.
दि. २९.३.२००८.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्र** | **:कोल्हापूर / ५१** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.दिलीप अशोक देसाई<br>ए-२२, 'सरगम विहार', अपार्टमेंट,<br>जि.प.ऑफिसमोर, नागाळा पार्क,<br>कोल्हापूर-४१६००३ |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.४,<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर, जि.कोल्हापूर |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर |

अपीलकर्ता, अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी हजर राहात नसल्याबाबत काहीही कळविलेले नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी कळविले असले तरी प्रतिनिधी प्राधिकृत करणे आवश्यक होते. अपीलकर्त्यास माहिती दिल्याचे दिसून येते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**